


REFBK-0025568
REFBK-0025568

संदर्भ काव्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पद्दा)
५०००–११–८६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५७०
ग्र. क्र. २५५९६
काव्य
२९४५८
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

बापूराव जगताप

# मॉस्कोतील कविता



# मॉस्कोतील कविता

बापूराव जगताप

REFBK-0025568
REFBK-0025568

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

© चंद्रकला बापूराव जगताप
द्वारा : वसंतराव नाईक महाविद्यालय
औरंगाबाद

प्रकाशनकाल : प्रथमावृत्ती
१ डिसेंबर १९८७

मुखपृष्ठ : सुभाष अवचट

**मूल्य : सत्तावीस रुपये पन्नास पैसे फक्त**

मुद्रक :
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव, पुणे ३०

अनंत काळापासून माझ्या मनात
वसत आलेल्या

प्रा. चंद्रकुमार नलगे, सौ. सुनंदा नलगे
आणि

प्रा. फ. मुं. शिंदे, प्रा. सौ. लीला शिंदे

मनस्वी मॉस्कोनगरींना

## मॉस्कोच्या वाटेवर....

‘ नामदेव ढसाळ, रा. ग. जाधव, गो. मा. पवार, नारायण सुर्वे, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, सदा कऱ्हाडे, व्यंकटेश माडगूळकर, प्र. श्री. नेरुरकर, ना. धों. महानोर, दया पवार, एस. एस. भोसले, नागनाथ कोत्तापल्ले, अरुण कांबळे, बा. ह. कल्याणकर, अहमद यासीन बागवान, राम बसाखेत्रे, लक्ष्मण माने, महावीर जोंधळे, अ. वि. कुळकर्णी, बदिऊजमॉ खावर ह्या माझ्या प्रिय आदरणीय मित्रांनी मी मॉस्कोला जाण्यापूर्वीच माझ्या हृदयात कोरलेली मॉस्को चिरंतन झाली. ’

‘ भारत रशिया मैत्रीचं जिवंत प्रतीक म्हणून फक्त माझ्याच प्रतीक्षेत असलेली झेन्या रोमानोव्हा मॉस्कोला अखेर भेटलीच. सोव्हिएत रशिया तिच्याहून निराळा राहिला नाही. ’

‘ मॉस्कोतल्या मानवतेच्या उत्कटतेनं ओतप्रोत भरलेलं मन म्हणजे इथल्या निखळ जनतेचे शरद पवार. पृथ्वीतलावरचा कोणताही भूभाग असो, आमच्या शरदरावांच्याशिवाय तो पुलकित होऊच शकत नाही. माझी रशिया भेट म्हणजे बारामतीतली विश्वविश्वार्हता मी मानतो. ’

**बापूराव जगताप,**
प्रमुख, मराठी विभाग,
वसंतराव नाईक, महाविद्यालय,
औरंगाबाद महाराष्ट्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

१

हे मॉस्को ! तू मला एक नवं अंतःकरण बहाल केलंस
ज्या अंतःकरणाच्या शोधात माझा सुंदर देह
कित्येक वर्षांपासून कित्येक देशांत भटकत होता
ते अंतःकरण मला तू मस्कवॉ नदीच्या
मंजूळ स्वरांच्या साक्षीनं दिलंस

हे मॉस्को ! इथली भोळी भाबडी प्रेमळ माणसं
मला जगातले सर्वांत पराक्रमी
माझे भाऊ बहिणी वाटतात
इथल्या मातांना जगन्माता होण्याचं वरदान
ऑक्टोबर क्रांतीनंच दिलंय
मला मिळालेल्या हे सुंदर अंतःकरणा !
माझ्या सुंदर देहात गुंतून पडू नकोस
तुला अनेक देहांना चैतन्य द्यायचं आहे
संपत्तीवर आणि संपत्तीसाठीच जगणाऱ्या
माणसांतल्या मृतांना
माणसांच्या जिवंत दुनियेत न्यायचं आहे
एकाकी, स्वतःसाठीच जगणाऱ्या कृत्रिम देहांना
निसर्गाचं एक अकृत्रिम जीवनहास्य द्यायचं आहे
तुला आणि मला जगच सुंदर करायचं आहे

हे मॉस्को ! तू दिलेल्या अंतःकरणाचा रंग
काळा-पांढरा-लाल-हिरवा की केशरी
ह्याची मला चिंता नाही
एक इंद्रधनुष्य व्होल्गा ते गंगा
थेम्स ते सिंधूपर्यंत पसरलेलं मी पाहातोय
कदाचित् ते माझ्या नव्या अंतःकरणाचं
पूर्वपश्चिमेच्या आकाशातील प्रतिबिंबच असेल
खरं तर ते माझंच नवं अंतःकरण असेल.

## २

मॉस्को ! हे कुण्या मुलखाचं आभाळ
तू माझ्यावर पांघरलं आहेस
गॉर्कीहिलपासून ते हिमालयापर्यंत
कॉकेशस पर्वतापासून ते सह्याद्रिच्या शिखरापर्यंत
आषाढ मेघासारखं गरजणारं हे आभाळ
जगाच्या जळत्या उजाड माळरानावर
कधी कोसळेल हिरव्या राईसाठी !
मैदानी हिरव्या बोलीसाठी...

मॉस्को ! हे कुण्या मुलखाचं आभाळ
व्होल्गा-लेना-कृष्णा-गोदेच्या पाण्यासारखं
माझ्या शुष्क हृदयात
हजारो कालव्यांतून उधळत वाहणारं
अरेबीक वाळवंटातील
बोडक्या झाडाझुडुपांना पालवी फोडणारं
साऱ्या जगावर चांद्रयानातून तारकाफुलं उधळणारं...

मॉस्को ! हे कुण्या मुलखाचं आभाळ
व्होल्गा गंगा प्रीतिसंगमासारखं
सारी अण्वस्त्रं पिऊन
बुलंद लाल किल्ल्यासारखं
जागतिक संघर्षाला लाल चौकात गाडून

मुक्त विहार करणाऱ्या
पांढऱ्या शुभ्र कबुतरासारखं
हे कुण्या मुलखाचं आभाळ

मॉस्को ! हे कुण्या मुलखाचं आभाळ.

## ३

मॉस्कोत लोखंडी भिंतींच्या पलिकडे
मी एक प्रदेश पाहिलाय
जिथं माणसांमाणसांतले सारे हेवेदावे
सारे व्यक्तिगत संघर्ष मातीत गाडले आहेत
आणि फक्त माणसातल्या
स्वच्छ भावनांचे सुंदर आकाश
त्या प्रदेशावर झुलतं आहे

इथंच जगातली मानवता
सर्जन रुजतं आहे
इथंच प्रत्येकाच्या ओठातून
शांती पाझरते आहे

भिंतींच्या पलिकडे उभा असणारा प्रत्येकजण
ज्यांना जगातील सर्वांचं शोषण करायचं आहे
त्यांनीच ह्या पारदर्शक भिंतींना
'ह्या लोखंडी भिंती आहेत'
असं जगाला म्हणायला शिकवलंय

पण ह्या पारदर्शक भिंती आता
जगाला उद्याची कित्येक शतकांची
समर्थ दृष्टी देतील
सुंदर फुलांचे प्रदेश

सर्वांच्या हातावर देतील
ते पहिलं एकविसावं शतक आता दूर नाही
मित्रांनो, मॉस्को आणि आपणही
आता एकमेकांपासून फार दूर नाही.

## ४

* पोतेमकिन ! तू लाल निशाण
सागरावर फडकवलंस
आणि सागरात एका सूर्याला
जन्माला घातलंस
अजूनही तो लाल गोळा
ओडेसी बंदरात तळपताना मी पाहातोय···
हे पोतेमकिन जहाजा !
तुला सातीसमुद्रातून मला मिरवत न्यायचंय
बंदराबंदरातून गोड्या पाण्याचे झरे
तुझ्यात ओतायचेत
तुला सामील होणाऱ्यांचा विजय जवळ आहे···
ते बघ सर्व दिशांनी तुझ्याकडे
आरमारी दलांची जहाजे
निशाणं फडकावीत निघालीत···
ह्या सागरात जन्माला आलेल्या
क्रांतीसूर्याला वाढवण्यासाठी
मला एक लाल छप्पर बांधायचं आहे
पोतेमकिन ! तू आता माझ्या हृदयसागरात
नांगर टाकून स्थीर हो
बघ जगाला सावली देण्यासाठी
मी जगावर सुंदर लालसर छप्पर बांधीन.

---

* पोतेमकिन = १९०५ साली सोव्हिएत क्रांतीतील पहिलं बंडखोर आरमारी जहाज.

## ५

* ब्लादिमीर इलिच तू हात वर केलास
पण चर्चमधल्या घंटा वाजल्याच नाहीत
प्रार्थनेसाठी चर्चचं द्वारही खुलं झालं नाही
तरिही जगातील लाखो मातांचं
उबदार हास्य तू खुलं केलंस
आणि हिमवादळाचं बर्फ वितळून गेलं
ती सुप्रभात मी प्रेमभरानं आजही थोपटतोय…
ह्याच हातानं इलिच तू ईश्वर बंदिस्त केलास
आणि माणूस मुक्त केलास
ईश्वराचेही चुकीचे कायदे दुरुस्त करणारा
तुझा पोलादी प्रेमळ हात
मला अलगद घेऊन जायचाय
कारण तो हात जगाचं देणं आहे
चर्चची घंटा आणि चर्चची दारं
फक्त बंदिस्त परमेश्वरासाठीच आहेत
ब्लादिमीर तू हात वर केलास तेव्हा…

---

* ब्लादिमीर इलिच = लेनिन

## ६

हे मॉस्कोच्या भाग्यविधात्या !
शक्तिशाली नायका
मला प्रचंड मोठी भाकर दे
मला किती शतकांची भूक लागलीय
कोट्यवधी उपाशी पोटी जगणाऱ्या
मरणाऱ्या माणसांच्या प्रेमाची...
ही भाकर कधी संपूच नये
अशा तुझ्या वरदानाचाही मी भुकेला आहे
भारतात स्वप्नं पाहता पाहता
तारुण्याचे घोष विरून गेलेत
जगाच्या सांस्कृतिक क्रांतीकडे झेप घेता घेता
सागर पार करणारे माझे पायही थकून गेलेत
हे मॉस्कोच्या भाग्यविधात्या !
शक्तिशाली नायका
मला महान् पराक्रमी हात दे
जे सातासमुद्रापलिकडच्या
दऱ्याखोऱ्यांत पोहोचतील
काळ्यागोऱ्यांना एकत्र आणतील
आणि अण्वस्त्रांचे सारे साठे नष्ट करतील..
ह्या हातांना श्रमाचा सुगंध दे
निसर्गाचा हिरवा श्वास दे
आकाशाची निळी माया दे
आणि धरतीचं ओलं आईपण दे

हे मॉस्कोच्या भाग्यविधात्या !
शक्तिशाली नायका
तुझ्या चिरंतन समाधीतला
चिरंतन आवाज माझ्यात घुमू दे
नाहीतर मलाही तुझ्या आत
समाधीस्थ होऊ दे.

७

मॉस्कोच्या भूमीवर पाय ठेवण्यापूर्वीच
ढगांच्या वर असताना
मला सुगंध आला
हिरव्या गच्च भरलेल्या गव्हाच्या शेतांचा
फळांनी लगडून गेलेल्या वृक्षांचा
आणि खाणीत काम करणाऱ्या कामगारांच्या श्वासांचा
मॉस्कोच्या भूमीला स्पर्श करताच
मी ह्या प्रिय श्वासात बुडून गेलो
समाधानानं ओसंडणाऱ्या
निळ्या डोळ्यांच्या प्रवाहात
मी नकळत होडीसारखा ढकलला गेलो...
आणि किनाऱ्यावरच्या हिरव्या राईतून
मला व्याकूळ करून सोडणारे हे स्वर कुणाचे !
हे संगीत, हे समाधान माझ्या आत
व्होल्गा होऊन कधीपासून वाहातंय !

हे मॉस्कोच्या प्रिय परिसरा
मला असंच इथंच समाधीस्थ राहू दे
लालचौकातील लेनिनच्या विश्रांतीसारखं.

## ८

लाल चौकात अचानक
माझ्या काळजावर स्वर आदळले
क्रेमलिनमधील अतिसुंदर घंटा
तर शांतच होती
... चर्च तर भूभागात रुतूनच
बसल्यासारखं दिसत होतं
आणि त्या तिथं पलिकडे
एक अमरज्योत तेवत होती
शेजारी एक तरुणी बागेत बसून
पियानोचे स्वर छेडीत होती
आणि एका अनामिक स्वातंत्र्यसैनिकाचा
प्रज्वलित अमर आत्मा
माझ्या खांद्यावर हात ठेवून
माझ्याशी हितगुज करीत होता...
समोर सोनेरी सकाळसारखी
फुलून आलेली बाग
दूर आकाशात भर दुपारी
चमकणारा चवथीचा चांद

हे क्रेमलिनच्या बुरुजांनो !
जगावर माणसांचं, शांतीचं
साम्राज्य प्रस्थापित करण्यासाठी
त्या शूर सैनिकाने आपले महान् स्वर

आज माझ्या गळ्यात बांधलेत
...बघ ! साम्राज्यवादी झारची घंटा
कशी शांत आहे
मी जगावेगळ्या गाण्यांनी जग जिंकणार म्हणून...

## ९

ना स्फोटांची गरज आहे
ना बॉम्ब-गोळ्यांची गरज आहे
जग सुंदर आणि शांततामय होण्यासाठी
लेनिन तुझा समाधीतला आवाज पुरेसा आहे.
पुरेशी आहे लाल चौकातील समाधी
अध्यात्मिक गाण्यालाही
क्रेमलिनची शांतता पुरेशी आहे.
गरिबीच्या खवळलेल्या सागरात
लेनिन तुझ्या विचारांचा एक दीपगृह आहे
जगाला सुखासमाधानाचा किनारा
उद्याच्या पिढीला तो आधार आहे.
लेनिन तुझ्या बंदरावर फडकणारे ध्वज
जगाच्या जहाजाला विसावा देणारे हात आहेत
घराघरांतील मुक्तियुद्धाचं भविष्य
लेनिन तुझ्या तळहातावर आहे.

## १०

हे माझ्या प्रिय मॉस्को
सत्याचा आवाज इथं
मी कोणत्या दिशेतून ऐकतोय !
खरं तर सर्वांच्या आयुष्याबद्दल
विचार करणारा मी
इथं सर्वांचं कल्याण होतंय
ह्या शब्दांच्या आवेगानं
मी का कासावीस होतोय !

माझं भारतातील
शांत निवांत असणंसुद्धा अर्थपूर्ण होतं
माझ्या यातनासुद्धा चांगल्या असतात म्हणजे काय ?
माझ्या आतील कोणत्या शहराचं नाव भविष्यकाळ ?
नुसता प्रवास करून माणूस
मुक्कामाला पोहोचू शकत नाही...
माझ्या आतला कुणीतरी खलासी
करुण गीत गातोय
बोटीतल्या बंबाची भट्टी पेटत नाही म्हणून
हे माझ्या प्रशांत महासागरा !
मीच आता प्रवासासाठी सुरुवात केलीय
इथं कमांडर म्हणून माझी नेमणूक झालीय

ह्या सुंदर टप्प्यावर भेटलेल्या
हे माझ्या यूरोपियन प्रिये !
प्रेम म्हणजे उदात्त कार्य
तरिही तू काय शोधतेस माझ्यात ?
माझी अखेर हिंदी महासागरातच व्हायची
जागतिक शांततेसाठी...
भारत सोव्हिएत मैत्रीसाठी.

## ११

हे मॉस्कोच्या भूमी !
तू कोणतं आकाश
माझ्यावर पांघरलं आहेस
ऑक्टोबर क्रांतीतील लढवय्यांची
मला आठवण झाली
आकाशानं मला स्पर्श केला तेव्हा...
मी त्यांना कृतज्ञतापूर्वक नमस्कार केला
कारण, त्यांना कुणी त्यांच्यासाठी
शोक करावा हे आवडत नव्हतं
आपण धारातीर्थी पडलो म्हणून
आपल्या देशानं आपल्या वारसांना
सुवर्णपदकं बहाल करावीत
हेही त्यांना पसंत नव्हतं
त्यांना फक्त अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी
थडग्यांशी हसत खेळत गाडून घ्यायचं होतं
म्हणूनच त्यांचं जीवन
जगाला कधी मरताना दिसलं नाही
हे क्रांती ! आनंदी नजरेनं पाहात पाहात
तू मॉस्कोचं आकाश माझ्यावर पांघरलंस
हे मॉस्कोच्या निळ्यागर्द आकाशा !
मलाच तुझ्यासारखं होण्याचं वरदान दे
साऱ्या जगावर बाहू पसरून
आनंदानं मला ते उचलून घेऊ दे.

## १२

काळ्या ढगांतून आगीचा लोळ
लखलखत जावा
तसा सोव्हिएत रशियाचा संघर्ष
माझ्यावर कडाडून कोसळला
ह्या महान् क्रांतीच्या भूमीवरचा
माणसांच्या मुक्तीचा एवढा सुंदर लढा
जगाच्या इतिहासात कोणत्याच खडकावर
कोरला गेलेला नाही
मानवतेचं एवढं महान् मंदिर
पूर्व-पश्चिमेला कधी कुणी उभारलं नाही
म्हणून त्या प्रेरक भूमीवर
नतमस्तक होऊन मी आरोळी दिली

'हे मॉस्कोच्या महान् भूमी !
तुझी आतली धग मला दे
तुझी सारी प्रतिभा मला मिळू दे
तुझ्या मातीतून जन्मलेल्या मूर्ती
माझ्यात आकार घेऊ देत
आणि तुझ्यावरून वाहाणारी वादळं
माझ्या आत झंझावातासारखी घुमू देत

हे मॉस्कोच्या महान् भूमी !
तुझ्या इतिहासाच्या नकाशाचा

आकार मला दे
आणि त्याच्या सीमा
साऱ्या जगाच्या सीमांना मला भिडवू दे ! '

## १३

मॉस्को ! तुझ्या क्रांतिकारी रस्त्यांवरून फिरताना
माझ्या पावलांना सप्तसागराच्या शक्तिशाली लाटा
कोणी बहाल केल्या ?
आणि माझ्या हृदयात क्रेमलिनच्या परिसरातील
कोणत्या अनामिक अमर हुतात्म्यांचे आत्मे
संचार करताहेत ?
तो पलिकडे क्षितिजावर उगवणारा सूर्य तर
माझ्या आतील निळ्या पहाडातूनच उफाळून
आज वर येतोय

हे मॉस्को ! ही हसरी-सोनेरी कोवळी किरणं
हे निनादणारे निरागस हास्य
निळ्या डोळ्यांतून आणि सोनेरी केसांतून
पाझरताना मी पाहतोय
माझ्या खांद्यावर बसून गाणारी पाखरं
माझा सत्कार करणारी माणसं
माझ्यावर लालसर पालवी उधळणारी झाडं
आणि दाही दिशांना सर्वदूर जाणारा हा प्रकाश
मी आज पाहातोय
सारं आभाळच माझ्यावर आज झुकलंय
माझं स्वागत करण्यासाठी
मॉस्को ! तुझ्या क्रांतिकारी रस्त्यांवरून फिरताना...

## १४

हे गोदामाई ! तुझं पाणी मी पाहिलंय
रक्तानं लाल झालेलं
मराठवाडा विद्यापीठ नामांतराच्या निमित्तानं
तू अशी वाहाताना
मी माझं प्रतिबिंबही त्यात पाहिलंय...
तुझ्या काठावर तीर्थक्षेत्रं आहेत
असं मी इतिहासात वाचत आलो होतो
भाविकांचे पवित्र घोष हृदयात साठवून
तू प्राचीन काळापासून वाहाताना
अनेकांनी तुला पाहिलंय म्हणे...
पण मी तर ऐकलेत
गोरगरिबांच्या आक्रोशांचे प्रतिध्वनी
तुझ्या किनाऱ्यावर आदळताना...
दीन दलितांच्या जाळलेल्या झोपड्यांचे प्रतिबिंबही
शांतपणे वाहून नेताना मी तुला पाहिलेले आहे...

हे गोदामाई ! मला आता वाटतंय की
तुझं हे दूषित पाणी
बदलण्याची वेळ आली आहे
नव्या शुद्ध समाजजीवनाच्या धारा
तुझ्या उगमापासून तुझ्यात मला ओतायच्या आहेत
व्होल्गा मस्कवॉ नद्यांचं पाणी
तुझ्या प्राचीन प्रवाहात सोडून

मला पुन्हा तीर्थक्षेत्रांचे
आणि भाविकांचे घोष ऐकायचे आहेत
त्या वेळी कोणती राज्ये साम्राज्ये
तुझ्या काठावर उदयाला येतील
हेही मला पाहायचं आहे
एखादा लालचौक आणि क्रेमलिन
तुझ्या प्राचीन घाटावर मला बांधायचा आहे
त्या वेळी तुझ्या किनाऱ्यावर
सर्वांच्या शांत सुंदर गाण्यांचे प्रतिध्वनी निनादतील

हे गोदामाई ! तू अशी जगासाठी शांती वाहून नेणारी
क्रांती माता हो ..
तू माझीही माता हो...

## १५

मॉस्को नदीतून निघालेली
ही महोत्सवी स्नेहयात्रा
भारत-रशिया मैत्रीची

झेन्या ! मी तुझ्या डोळ्यातही पाहातोय
इझमॉयलोस्की पार्कमध्ये
रशियन वालॅलायिकावर
तुझा प्रेमळ हात संगीत छेडताना
मी जॉर्जियाच्या लोकसंगीताचे स्वर ऐकलेत...
ते स्वर माझ्या देशातील लोकांसाठी
तू हृदयापासून छेडलेस
ही कोणती महोत्सवी यात्रा
मी अनुभवली
माझ्या आत वाहाणारी
झेन्या रोमानोव्हा !
मॉस्को आणि तुझ्या माझ्यातला
हा मैत्रीपूर्ण संवाद
मॉस्को नदीतून वाहाताना...
मी तुझ्या निळ्या डोळ्यांतही पाहातोय
लेनिन, सिद्धार्थ गौतमाची प्रबुद्ध अंतःकरणंही
तुझ्या डोळ्यात उतरून आलीत

झेन्या ! ही कोणती महोत्सवी स्नेहयात्रा
जगाच्या सुखाच्या शोधात निघालेली.

## १६

झेन्या ! मॉस्कोत माझी नजर
शुभ्र आकाशाला आज भिडते आहे
लखलखणाऱ्या चांदण्यांनी
माझ्या पापण्या भरून आल्या आहेत
माझा देशही तसा महान् आहे
आकाशही निरभ्र असतं
पण तिथं आकाशानं माझ्यावर अंधारच ओतला
अंधाराच्या डोहातून वाहाणाऱ्या जखमा
ती उद्ध्वस्त गावं – ती गावकुसं
त्या जातिपंथांच्या स्वतंत्र गावी
गावाबाहेरची आमची अस्पृश्य गावं
वेगळ्या विहिरी- पाणवठे- स्मशानं

झेन्या ! आज माझ्या देशातील आकाश
तुझ्यासोबत असताना इथूनच वेगळं दिसतंय
माझ्या माणसांची गावं
नव्यानं बांधण्याचं सामर्थ्य
लाल चौकातून तू मला दे
झेन्या ! उद्याच्या ह्या नव्या गावातून
नवा देश मला बांधायचा आहे.

## १७

झेन्या ! माझ्या भारतात प्रेमाचा रंग निळा आहे
मैत्रीचा रंगही निळा आहे
तू मात्र सतत दुसऱ्या महायुद्धाच्या गोष्टी सांगतेस
उद्ध्वस्त लाल डोळ्यांनी पाहात बसतेस
खरं तर तू आज प्रगत राष्ट्रातली
युरोप खंडातली
मी पूर्वेतील आशियायी राष्ट्रातला
पण निळ्या रंगाला का सीमा असतात ?
ह्या सीमेवर स्टारवॉर लढत राहिलो
तर... परत व्होल्गा लाल होईल
एखादा हिटलर जन्माला येईल
जपान पुन्हा उद्ध्वस्त होईल
तू आणि मी कुठेही असलो तरी
एकाच उद्ध्वस्त जगात गाडले जाऊ
म्हणून म्हणतो शांतता-मैत्री-सहभाग
तुझ्या आणि माझ्यातलाही
उद्याचं तिसरं महायुद्ध टाळू शकेल
मग दुसऱ्या महायुद्धाच्या आठवणी कशाला !
बघ झेन्या ! तुला व्होल्गा निळी दिसतेय का !

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र.

# १८

झेन्या ! मॉस्कोच्या युवक महोत्सवात आपण भेटलो
तो दिवस होता २७ जुलै, १९८५
त्या दिवशी शांत वाहाणारी मस्कवॉ नदी
उरात घेऊन मी लेनिन स्टेडियमवर होतो
समोर साऱ्या जगातून येऊन बसलेली
हजारो शुभ्र कबुतरं विहरताना पाहात होतो
जागतिक शांततेच्या ह्या निळ्या आभाळात…
पण उद्या कुणी ह्या निळ्या जलाशयात
विषारी अण्वस्त्रांचे स्फोट तर करणार नाही ना ?
ह्या भीतीनं माझे पंख थकून गेले होते
माझी ही अवस्था पाहून

झेन्या ! तुझे निळे डोळे व्याकुळ झाले होते
आणि इथंच सारी अण्वस्त्रं
नष्ट होताना मी अनुभवत होतो
पूर्व-पश्चिम, काळे-गोरे, डावे-उजवे
हातात हात घेऊन गाताना-नाचताना
उद्याचा नवा इतिहास कोरला जाताना
मी साक्षीदार होतो
आणि त्याच वेळी उत्फुल्ल होऊन

झेन्या ! तू मला मिठी मारलीस
म्हणालीस ' बापूराव ! भारत रशिया मैत्री चिरायू होवो '
तो दिवस होता २७ जुलै, १९८५.

## १९

मॉस्कोत इझमॉयलोस्की पार्कमध्ये मला मोर * भेटला
सोनेरी पिसारा उभारून तो माझ्यासाठी नाचला
निळ्या डोळ्यांतून माझे भाव निरखीत राहिला
तो गात होता, धुंद गात होता
पार्कमधल्या फुलांना उब देत होता
मला त्याचं गीत कळत नव्हतं
मला त्याचे शब्दही उमजत नव्हते
पण मनात अर्थ उलगडत गेले
आणि बघता बघता मीच इझमॉयलोस्की
पार्क होत गेलो ...
आता माझ्या अंगाखांद्यावर पालवी फुटलेले
सूचीपर्णी वृक्षा होते
वृक्षांच्या फांद्यावर सूर्याची कोवळी किरणं होती
तो किती नाचत होता
हे नेमकं आठवत नाही
पण हिमवर्षावाची चाहूल मला लागली
मी ओरडून सांगत होतो

हे माझ्या प्रिय मोरा ! तू उबदार प्रदेशात जा
लवकरच इथं हिमवर्षाव होईल
माझे शब्द त्याला कळत नव्हते

---

* मोर – माझी रशियन मैत्रीण झेन्या रोमानोव्हा.

की, तो धुंद होता की काय ? समजलं नाही
मी उबदार पोषाख अंगावर चढवला
आता माझ्या अंगाखांद्यावर बर्फ घरंगळत होतं
हलकं वादळही सुरू झालं होतं...
मी त्याचा पिसारा मिटवून घेत होतो
आणि तो अधिकच फुलारून नाचत होता...
माझ्या डोळ्यांसमोरच तो बर्फात गाडला गेला
त्याचे निळे डोळे तेवढे मला दिसत होते
आणि त्यावरही बर्फाचा वर्षाव सुरू झाला
... आता इझमॉयलोस्की पार्क निष्पर्ण उभं आहे
निष्पर्ण वृक्षांच्या फांद्यांमधून मी
निळ्या डोळ्यांचा शोध घेतो आहे
किती काळ ते आठवत नाही
परंतु पुन्हा वसंतऋतूची चाहूल येते आहे
आभाळात सूर्य घोषणा देतो आहे

'इझमॉयलोस्की पार्क लवकरच हिरवं गर्द होईल
बर्फ वितळून जाईल
सुंदर फुलांचे ताटवे वर येतील
हलक्या वाऱ्याच्या झुळकीवर ते नाचतील'
पण मला आता काहीच दिसणार नाही
पार्क दिसणार नाही... हिरवळ दिसणार नाही
मी फक्त निळ्या डोळ्यांच्या शोधात आहे
मी निळ्या डोळ्यांच्या शोधात आहे.

## २०

झेन्या ! माझ्या देशातील आजची माझी खेडी
        नष्ट झालेल्या गावांची स्मशानं आहेत
        हसरी घरं कधीकाळी होती
        तिथं आता समाधानाच्या स्मारकांची दगडं आहेत
आमच्याच शहरांनी
        खेड्यांची ही स्मशानं केली
        आमच्याच स्वातंत्र्यसमतेच्या व्यवस्थेनं
        निसर्गाच्या ह्या आनंदी बागा उद्ध्वस्त केल्या
        जिथं आमच्या चुली होत्या
        तिथं अश्रूंच्या घंटा कुणीतरी बांधल्या
        शाळकरी मुलं पाखरासारखी
        कोणत्यातरी मुलखात निघून गेली
ह्या माझ्या बांधवांच्या
        अनामिक कबरी बांधणारे हात
        आज माझ्या देशातील कोणत्यातरी शहरात
        कोणत्या सुखात ! कोणत्या सत्तेत !
        स्वतःची स्मारकं बांधत आहेत
झेन्या ! क्रेमलिनच्या पायथ्याशी असलेल्या
        अनामिक सैनिकाचं स्मारक मला दे
        मला आमची खेडी इथल्या सोव्हिएत खेड्यासारखी
        आनंदाच्या बागांनी सजवायची आहेत
        तुझ्या नि माझ्या हातातून
        हे नवं जग उभं करायचं आहे

झेन्या ! माझ्या देशातली खेडी
नेहरूंच्या हातातील पांढऱ्याशुभ्र कबुतरासारखी
आकाशात झेपावत
शांतीदूत झालेली पाहायची आहेत.

## २१

मॉस्कोत, वसंतऋतूत संगीताची वाद्यं घेऊन
झेन्या तू आलीस
इझमॉयलोस्की पार्कमध्ये वाट पाहात
असलेल्या मला पाहून
अमृत ओठांनी हसलीस
मी ज्या डवरलेल्या वृक्षाखाली उभा होतो
त्याचं नाव मला माहीतही नव्हतं
पण माझ्या ओठांत त्या वेळी
गौतमबुद्धाचं स्मित होतं
महावीर-विवेकानंदांच्या नेत्रांतील शांतता
माझ्याही नेत्रांत होती
तू भारत-सोव्हिएत मैत्रीसाठी
गिटारवर स्वर छेडीत होतीस
मी माझ्या देशातील सारे धर्मसंस्थापक
तुझ्या निळ्या डोळ्यांतून
जन्म घेताना पाहात होतो

झेन्या ! इथली जनता
इथली जमीन
आपण सारे एकच आहोत
जगातली एक सुंदर महान शक्ती आहोत.

## २२

हे माय ! तू जन्म दिलास
तेव्हापासूनच मी का दूर आहे ?
मला आठवतंय, कृष्णा गोदावरीपेक्षा
तुझ्या मायेनं ओथंबलेल्या कुशीपेक्षा
मला डोंगरांच्या छातीवर सुरक्षीत वाटायचं
सोव्हिएत संघराज्याच्या मस्कवॉ व्होल्गाच्या
त्या वेळी न पाहिलेल्या पण शांत वाहाणाऱ्या
जलाशयांवर मी स्वप्नात तरंगत जायचो
त्याहीपेक्षा जागतिक शांतीकेंद्र असलेल्या
सागरांच्या उधाणाचं मला आकर्षण वाटायचं

हे माय ! तू मुकी बहिरी अडाणी
मी कोण ! मी कोणत्या जगात !
मी दिल्लीत की मॉस्कोत !
मी काळ्या गोऱ्यांच्या वर्णभेदविरोधी आंदोलनात
की स्टारवॉरच्या विरोधी लाँगमार्चमध्ये ?
तुला कसं समजणार !
तुला आई म्हणून हाक मारायचं
भाग्यही मला कधी मिळालं नाही
भारतात काळ्या मातीखाली
तू सदैव राबत होतीस
गावकुसाखाली तर तू
कधी गाडली गेली होतीस ...

आणि मी तर जगातील साऱ्या बंदिस्त भिंतींना
जिवंत करून त्यावर आरूढ व्हायचो
निळ्या उंच आभाळात प्रचंड गतीने जायचो

हे माय ! पुढील जन्मी मलाच
तुझी माय व्हावं लागेल
उद्याच्या जगातील तुझ्यासारख्या लाखो आयांचीही
'मॉस्कोमाय' मलाच व्हावं लागेल.

## २४

वोल्गा नदीच्या तीरावरील
हे सिम्बिर्कच्या§ महान् नगरी
व्लादिमीर* उल्यानोव नावाचा महापुरुष
तुझ्या धरतीचे खडक फोडून जगात अवतरला
त्या वेळी मारिया अलेक्झांद्रोवना¶
जगातील ती महान् माता
कोणती स्वप्नं पाहात होती ?
तिथं झाडाझाडांवर बसलेले पक्षी
कोणती गाणी गात होते ?
आल्प्स पर्वतावरून कोणता वारा वाहात होता ?
कोणत्या महाकाव्याच्या पानांची सळसळ
वातावरणात घुमत होती ?
त्या सुंदर गोष्टी मला सांगशील का ?
त्या गोष्टी मला रामायण-महाभारत
येशू, बुद्ध, हजरत पैगंबरांच्या तत्त्वज्ञानाशी
जोडायच्या आहेत
मला इथल्या झाडांच्या सावल्याही
माझ्या बांधवांसाठी घेऊन जायच्या आहेत
ही गाणी त्यांच्या गळ्यात, ओतायची आहेत

---

§ सिम्बिर्क = लेनिनचे जन्मगाव
* व्लादिमीर = लेनिन
¶ मारिया अलेक्झांद्रोवना = लेनिनची आई.

## २३

दिल्ली ! इथल्याही काही किल्ल्यांचे
रंग लाल आहेत
पण माणसं त्यात गुलाम आहेत
संपूर्ण स्वातंत्र्याचा तिरंगा ध्वज
तिथं अजून फडकलाच नाही
सर्वंकष स्वातंत्र्यासाठी
एक नवं राष्ट्रगीत मला गायचं आहे
मॉस्कोमध्ये मला ते शोधायचं आहे
आणि कधीतरी पुन्हा
१५ ऑगस्ट १९४७ ची स्वातंत्र्यपहाट
गुलाबी किरणांनी उजळून निघालेली
मला पाहायची आहे
ज्या वेळी हे नवं राष्ट्रगीत
भारतातल्या प्रत्येकाच्या कंठातून गाइलं जाईल
त्या वेळी मॉस्को ते दिल्ली
असं एक विश्वगीत कोट्यवधी कंठांतून
निघालेलं मला ऐकायचं आहे

दिल्ली ! इथल्याही किल्ल्यांना लाल रंग
भविष्यात मला नव्याने द्यायचे आहेत.

## २४

वोल्गा नदीच्या तीरावरील
हे सिम्बिर्कच्या§ महान् नगरी
ब्लादिमीर* उल्यानोव नावाचा महापुरुष
तुझ्या धरतीचे खडक फोडून जगात अवतरला
त्या वेळी मारिया अलेक्झांद्रोवना¶
जगातील ती महान् माता
कोणती स्वप्नं पाहात होती ?
तिथं झाडाझाडांवर बसलेले पक्षी
कोणती गाणी गात होते ?
आल्प्स पर्वतावरून कोणता वारा वाहात होता ?
कोणत्या महाकाव्याच्या पानांची सळसळ
वातावरणात घुमत होती ?
त्या सुंदर गोष्टी मला सांगशील का ?
त्या गोष्टी मला रामायण-महाभारत
येशू, बुद्ध, हजरत पैगंबरांच्या तत्त्वज्ञानाशी
जोडायच्या आहेत
मला इथल्या झाडांच्या सावल्याही
माझ्या बांधवांसाठी घेऊन जायच्या आहेत
ही गाणी त्यांच्या गळ्यात, ओतायची आहेत

---

§ सिम्बिर्क = लेनिनचे जन्मगाव
* ब्लादिमीर = लेनिन
¶ मारिया अलेक्झांद्रोवना = लेनिनची आई.

इथले शांत वाहाणारे निर्झर उचलून
माझ्या देशात आणि आशिया-आफ्रिकेच्या
भूमीत पेरायचे आहेत

हे सिम्बिर्कच्या महान् नगरी
हा तुझ्यावर झळकणारा ध्रुवतारा मला दे
जागतिक शांततेसाठी मला तो
आकाशात झळकावयाचा आहे
आणि ते दूरवर पश्चिमेचे खवळलेले समुद्र
आज शांत का झालेत ?
त्या सागरावरून दौडत येणाऱ्या नौका माझ्यासाठी !
मी त्यांच्या स्वागताला निघालो आहे
व्लादिमीर उल्यानोव ! मला तुझी सोबत आहे
मी आता शांतिसागरावरचा अजिंक्य खलाशी आहे.

## २५

काळ्या सागराच्या सोनेरी किनाऱ्यांनो
भारतात येऊन माझ्या हृदयाला भिडा
मी तुमच्या स्पर्शासाठी रोज
हिमालयाच्या आणि उरल पर्वतांच्या रांगांवर
इथून धडका घेतोय ...

हे काळ्या सागराच्या शुभ्र लाटांनो
माझ्या आत मला एक काळा सागर द्या
मला त्या सागरात बुडून अमर व्हायचं आहे
एकविसाव्या शतकातील पिढ्यांसाठीचे
शांतीस्मारक बनायचं आहे ...

काळ्या सागरावरील प्रिय वाऱ्याच्या झुळकांनो
थोडसं वादळ मलाही पाठवून द्या
त्यावर बसून मी लहरत लहरत येईन
माझ्या आतील स्वप्नभूमीला कवटाळण्यासाठी ...

काळ्या सागरातील हे उबदार झऱ्यांनो !
वादळांनो- प्रकाशकिरणांनो
तुमचा सारा निसर्ग माझ्यात
कधीच बहरलाय ...

आता फक्त जगात सुखाच्या
खनीज खाणी खणण्यासाठी
एक उद्याचा इतिहास माझ्या हाती द्या.

## २६

हे सोव्हिएत भूमी
तुझ्या महान् प्रयोगशील विशाल हृदयावर
मी महायुद्धांची अनेक स्मारकं पाहिली
शौर्य–शोक–दुःखांची ...
ताश्कंदला उद्ध्वस्त करणाऱ्या
भूकंपाच्या विराट धक्क्याचा अनुभवही
तुझ्या आत धगधगताना पाहातोय
प्राचीन काळात उद्ध्वस्त झालेले
तुझ्या उरातील दुधाचे सागर
आज पुन्हा जगासाठी उधाणताना पाहातोय
मी तर तुझ्या मातृत्वाच्या महान् धारांनी
न्हाऊन निघालोय
हे उद्याच्या शांती इतिहासाच्या
सोव्हिएत भूमी
मला असंच तुझ्या वात्सल्याच्या धबधब्याखाली
अमरत्वाची निद्रा घेऊ दे.

## २७

मास्कोत मी पाहिले— राजवाडे
थकल्या भागल्या जनतेची
विश्रामगृहं झालेले - राजवाडे
रोगानं जर्जर झालेल्यांसाठी
उपचारकेंद्रं असलेले - राजवाडे
छोट्या छोट्या मुलांची
ज्ञानदानाची केंद्रं असलेले
सर्वांचेच - राजवाडे

मलाही - असे राजवाडे
माझ्या देशात बांधायचे आहेत
भ्रष्टाचारांनी उभारलेल्या देशातील भव्य इमारतींचे
अशा राजवाड्यात रूपांतर करायचं आहे
डोंगरदऱ्यांतील वनवासी मुलांना
त्यात ठेवून शिक्षण द्यायचं आहे
झोपडपट्टीत गटारांच्या काठी
सडलेल्या माझ्या मातांना
हे राजवाडे बहाल करायचे आहेत

माझ्या देशातील गावकुसाबाहेरचे माझ्या बांधवांचे राजवाडे
गावात आणून बांधायचे आहेत
आणि दूरवर खेड्यात मातीत गाडलेल्या-मेलेल्या
माझ्या बापासाठी

त्याला जिवंत करण्यासाठी
असे राजवाडे मला उभे करायचे आहेत
असे राजवाडे मला लवकरच हवे आहेत.

## २८

मॉस्कोत मी नांगर पाहिले
माणसांच्या मनाची मशागत करणारे
माणुसकीचे भरघोस पीक सर्वांसाठी पिकवणारे
असे हे नांगर मॉस्कोच्या परिसरातच
शेतकऱ्यांनी सामूहिक रित्या जमिनीत चालवताना
पाहिले
आणि मला आठवण झाली
माझ्या देशातील नांगरांची
जो नांगर शेतकऱ्यांच्याच घरादारांवर फिरवला जातो
खेड्यातल्या अर्थव्यवस्थेवर चालवला जातो
पाणी-वीज-आरोग्य-शिक्षण--रस्ते
आणि सांस्कृतिक जीवन
उद्ध्वस्त करण्यासाठी वापरला जातो

मॉस्कोतले नांगर पाहाता पाहाता
मला वाटले
हे नांगर माझ्या देशातील शेतकऱ्यांनी हातात धरावेत
आणि सर्वांनी एकवटून उंच उंच इमारती
सजवलेले बंगले
मोटारींच्या ताफ्यावर सर्वशक्तींनी चालवावेत
त्यापूर्वी वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यावर
विचारवंतांच्या भ्रष्ट डोक्यावर
संपत्ती दडवून ठेवलेल्यांच्या ढुंगणावर

आणि स्वतःसाठी राजसत्ता चालवणाऱ्यांच्या
हृदयात नांगरफाळ घुसवावेत
तरच त्यांच्या पाषाण हृदयाची थोडी मशागत होईल
थोडीफार डोक्याची, विचारांचीही मशागत होईल
त्यातूनच उद्याचं निरोगी मनाचं पीक भरघोस येईल
आणि जमिनीतून हिरवं-सर्वांचं जीवन जन्माला येईल
नवी पिढी हसरी नाचरी होईल

मी मास्कोच्या परिसरात नांगर पाहिले
माझ्या शेतकरी बापांनी हातात घेण्यासाठी
ह्या मनाला-माझ्या देशातील मातीला-आकाशाला
चैतन्य देण्यासाठी
मॉस्कोत मी नांगर पाहिले

## २९

हे मॉस्कोच्या लाल सूर्या !
मला तुझं पहिलं दर्शन घेण्यासाठी
तू क्षितिजावर ये...
इथली पहाट मी पांघरली आहे
घरट्यातून बाहेर पडणाऱ्या पाखरांबरोबर
पहाटेची मंजूळ गाणी गातही फिरतो आहे
हे प्रिय पाखरांनो,
मला तुमच्याबरोबर असंच गात फिरू दे
तुम्ही पंख हलवीत धडपड करता
धान्याचा एक एक कण गोळा करता
मला तुमच्या प्रदेशातही घेऊन जा
कारण, मी एका भयानक स्वप्नांच्या
प्रदेशात वावरतो आहे
दुष्ट दुराचाऱ्यांच्या संगतीत राहतो आहे
मी माझे मित्र–नातेवाईक–शेजारी–गाववाले
ह्यांना लुबाडून खातो आहे
त्यांना पूर्ण खाऊन संपल्यावरच
माझा प्राण जाईल
हे प्रिय पाखरांनो,
मला ह्या स्वप्नातून बाहेर न्या
आणि त्या दूर क्षितिजावरून ढकलून द्या
जिथं उगवणारा लाल सूर्य
स्वतःच्या हातांनी मला झेलून घेईल.

## ३०

हे मॉस्को ! वेदनांच्या वाटा संपतील
असं गीत इथं कोण गातोय ?
हे आक्रोशाचं झुकलेलं आभाळ
इथं कोणी तोलून धरलंय !
रानावनात हा आंधळा अंधार
तेजोमय करणारा कोणता प्रकाश
इथं अवतरलाय ?
मला तर इथंच
मानवी स्वातंत्र्याचा अलौकिक श्वासही
ऐकू येतोय
शोषण करणारी सारी विषारी शहरं
इथं कोणी पेटवून दिलीत ?
दारिद्र्यानं, दास्यत्वानं हिमयुग झालेल्यांना
इथं कोणी अग्नी पुरवलाय ?
हे मॉस्को ! वादळांनी वेढलेल्या
व्यक्तिगत संपत्तीच्या चक्रीवादळात
सापडलेल्या सागरी प्रवाशांना
एक आश्वासक किनारा
मी फक्त इथंच पाहतोय
हे मॉस्को ! हा लेनिनचा हात
माझ्या अंतःकरणावर राहू दे
आणि मला कोट्यवधी असे हात दे
जगाच्या काळजाला ते मला भिडवायचे आहेत

हे मॉस्को ! जगातील सर्वांच्या वेदनांच्या वाटा संपतील
अशा वादळी घोड्यावरही आम्हाला स्वार होऊ दे
समोर किल्ल्या-किल्ल्यावर फडकणारी निशाणं
माझ्याच सैनिकांनी फडकवलेली
मला इथूनच दिसताहेत.

## ३१

सूर्य विश्वाच्या आकर्षणक्षेत्रातून निखळलाच तर
म्हणतात ' पृथ्वीवर जीवसृष्टी–वनसृष्टी
अस्तित्वात राहणार नाही '
पण मॉस्कोत तर
तरुण तरुणींच्या हृदयातच
सूर्य तळपताना मी पाहात होतो
त्यांची उबही अनुभवत होतो
हे कोणतं आकाश ? हे कोणते सूर्य ?
उद्याचा सर्वांसाठी निसर्ग इथूनच वर्धिष्णू होईल
उद्याचा माणूस इथूनच ऊर्जा घेईल
त्यांची वचन देणारी
ही कोणती जादूनगरी ?
माझ्यासमोर खुल्या अंतःकरणानं
अशी का उभी ?
आणि इथले सूर्य तर
माझ्याच हृदयाच्या क्षितिजावर स्थिरावलेत

## ३२

तेजस्वी उद्याची पहाट माझ्या डोळ्यांत ओतत
मस्कवॉ नदी शांतपणे वाहाताना मी अजूनही पाहातोय
तेव्हा तर मी मॉस्कोच्या अंगाखांद्यावर
जगाची स्वप्नं उरात साठवून
भिरीभिरी फिरलो
एका विलक्षण चैतन्याच्या धुंदीत ...
वैभवशाली उज्ज्वल उद्यासाठी ...

हा ' उद्या ' मस्कवॉ नदीच्या काठाकाठावरून
हिरव्या गर्द झाडाझुडपांतून
मॉस्को विद्यापीठाच्या दगडी इमारतीमधून
माझ्या ओठात आणून कुणी ओतलाय ?
... ह्या एका महान् क्षणाला आत्मसात करण्यासाठी
मी वाट पाहिली होती भारताच्या भूमीत उभं राहून

हिमालयाच्या शिखरापलिकडे ही उद्याची हिरवळ
अस्तित्वात आहे ह्याची चाहूल मला
कित्येक वर्षांपासूनच आली होती
माझ्या शाळा ... माझी विद्यापीठं ... माझे विचारवंत
ह्यांच्यात वावरतानाही ' उद्या 'च्या भेटीसाठी
मी कित्येक रात्री जागा राहून गोळा केल्या होत्या
ती गोळाबेरीज मी मॉस्कोत पाहिली
आणि ' उज्ज्वल उद्याची पहाट '
मी फक्त मॉस्कोतच उगवलेली पाहिली.

# ३३

कुणी काहीही म्हणो !
मॉस्कोत, मी ऐकलाय आवाज
मुक्या माणसांचा मंजूळ आवाज
मुक्या माणसांचा मोकळा आवाज
आणि मी त्यांना मुक्तपणे गातानाही पाहिलंय
माझ्या देशातील दलित आदिवासींचे
शेतकरी, मजूर, कामगारांचे हुंदके बाजूला ठेवून
मी त्या गाण्यात सामीलही झालोय
खरंच सांगतोय,
मॉस्कोत मी ऐकलाय आवाज
मुक्या माणसांचा मंजूळ आवाज
मोकळा आवाज ...

मॉस्कोत मी सूर्यही पाहिलाय
अंधारकोठडीत लख्ख प्रकाश ओतणारा
सर्वांच्या घरांच्या छप्परावर तळपणारा
सर्वांना ऊब आणि प्राण देणारा
' ज्यांच्या घरादारांवर सूर्य कधी उगवलाच नाही
त्यांच्या हातातच सूर्य देण्याची '
फसवी घोषणा करणाऱ्या
माझ्या प्रिय भारतीय कवी मित्रांनो
मला क्षमा करा

खरच सांगतोय, मॉस्कोत मी सूर्यही पाहिलाय
अंधारकोठडीत लख्ख प्रकाश ओतणारा
सर्वांच्या घरांच्या छप्परावर तळपणारा ...

आणखी क्षमा मागून सांगतो,
मॉस्कोत मी पाऊस पाहिला
साऱ्या गावांना कुशीत घेऊन कोसळणारा
कधी अलवार डोळ्यानं टिपून घेता येणारा
तर कधी सर्वांच्या भागांत भाग्य भरून जाणारा
'कालचा पाऊस आमच्या गावात
कोसळलाच नाही'
असं म्हणणारा एकही व्याकूळ कवी
मला तिथं भेटला नाही
माफ करा मित्रांनो,
माफ करा कवी मित्रांनोही

कारण, मॉस्कोत मी पाऊस पाहिला
साऱ्या गावांना कुशीत घेऊन कोसळणारा
कधी अलवार डोळ्यानं टिपून घेता येणारा
माझ्याही देहामनाला चिंब भिजवणारा
मॉस्कोत मी पाऊस पाहिला
पावसाची गाणी ऐकली
मुक्या माणसांची गाणी ऐकली
आणि मी सुद्धा त्यांच्यासोबत गाणी गाईली.

## ३४

मॉस्कोतील लाल चौकात मी उभा राहिलो
हिम्मत धरून घोषणा देऊ लागलो ...
' भारतीय लोकशाही झिंदाबाद
भारतीय स्वातंत्र्य झिंदाबाद
भारतीय स्त्रीमुक्ती चळवळ चिरायू होवो '

बघता बघता माझ्याभोवती हजारो रशियन तरुणी जमल्या
हळूहळू माझ्याजवळ येऊ लागल्या
निळ्या डोळ्यांतून कुतूहल सांडीत पाहू लागल्या
एक धीट तरुणी पुढं आली
माझ्या गळ्यात हात टाकून म्हणाली
' मी भारतात येऊ काय ?
भारतात मुक्त स्त्री होऊ काय ? '

आता माझ्या घोषणा कंठात अडखळू लागल्या
तरिही डोळे मिटून मी म्हणालो
' भारतात तुला चुलीसमोर बसावं लागेल
गाडीभर अन्न शिजवावं लागेल
सासू-सासऱ्याच्या शिव्या आणि
नवऱ्याचा भरपूर मार खावा लागेल
तरिही हाच पती सात जन्म मिळो
असं म्हणावं लागेल
श्रीमंत घरात पडलीस तर

बुरख्यात मरावं लागेल
खेड्यात चुकून गेलीस तर
रस्त्याकाठी देहविधी उरकावा लागेल
हुंडा दिला नाहीस तर तुला जळावं लागेल
जळून मेली नाहीस तर जाळावं लागेल
दलितांच्या घरी आलीस तर
गावकुसाबाहेर वस्ती करावी लागेल
भटक्यांच्या पालात संसारी झालीस तर
उपरं जीवन जगावं लागेल
तुला जगात फक्त अशी भारतातच मुक्ती आहे
कारण, भारतीय नारी ही अशी आमची शक्ती आहे
पोट भरत नसेल तर
देहविक्री करण्याचं तुला स्वातंत्र्य आहे '

मी काय म्हणतोय, त्यांना समजत नव्हतं
पण त्या आता क्रेमलिनच्या बुरुजावर उभ्या होत्या
आणि माझ्या घोषणा लाल चौकात विरून जात होत्या
माझ्या घोषणा लाल चौकात विरून जात होत्या.

ना. क. ……

## ३५

मॉस्को, तुझ्यात खोदलेली कोरलेली लेणी पाहिली
चितारलेली चित्रशैली पाहिली
वेरूळ अजिंठ्यापेक्षा सुंदर संपन्न
लेनिन नावाच्या शिल्पकारानं कोरलेली
माणसातून मूर्ती घडवलेली लेणी ...

त्याच्या कलावंत हाताची विराट किमया
मी प्रत्येक माणसाच्या पहाडापहाडावर अनुभवली
त्यांच्या अंतःकरणाची सर्जनशीलता
मी माझ्या अंतःकरणाच्या स्पंदनातून पिऊन घेतली
उद्गार-उवदार-लयदार रेषांची
बौद्धिक समर्थता इथंच लक्षात आली

इथलं प्रत्येक मानवी शिल्प
आनंदानं उत्साहानं वाहातं आहे
त्यांचे समर्थ बाहू, पारदर्शी निळे डोळे
विश्वाच्या गुंफांना आधार आहे
इथल्या प्रत्येक शिल्पाचा हात
दुसऱ्याच्या हातात आहे

ही शिल्पं दाही दिशांना सौंदर्य उधळतात
निसर्गालाही सामर्थ्य देतात
उमलणाऱ्या ओठांतून सर्वांसाठी हास्य सांडतात

हा लेनिनच्या लेण्यांचा विलक्षण देश
जगावर बुद्धाच्या शांतीची कमळं
उधळत असलेला मी पाहिला आहे
मॉस्को, उद्याच्या जगाची तू माता आहेस.

## ३६

मॉस्कोत बारावा आंतरराष्ट्रीय
युवक महोत्सव चालू होता
त्या वेळी दूरवरून पश्चिमेकडून
रात्री खवळलेल्या सागराची गर्जना ऐकू येत होती
पण मॉस्कोच्या सीमेवरून, किनाऱ्यावरून
सागराच्या सुरेल संगीताच्या लहरी
पूर्व पश्चिमेकडे लहरत जाताना मी पाहिल्या
माझ्या शेजारी एक तरुण कमांडर होता
त्याच्या छातीवर झालेल्या जखमांतून
कमळांच्या फुलांचे ताटवे बहरले होते
आणि एका तोफखान्याच्या नळीवर
एक शुभ्र कबूतर गात होतं
माझ्या आत सारं जग एकत्र येत होतं
आता माझे आतले हजारो हात
सर्वांच्या जखमा बांधण्यात गुंतले होते
त्या वेळी मॉस्कोत युवक महोत्सव चालू होता
कधीच न संपण्यासाठी...

## ३७

अण्वस्त्रांच्या टोकावरची
        ही घरं... ही माणसं
कोणत्या खवळलेल्या सागरातील
        जहाजावर उभी आहेत
        त्यांना कुणी सांगावं !
इथं प्रत्येक लाटालाटांखाली
        जहाजफोड खडक आहेत
आपल्या शेपटीच्या फटकाऱ्यानं जहाजं बुडवणारे
        विक्राळ मासे इकडून तिकडे फिरताहेत
... आम्ही जहाजात सुरक्षीत आहोत
        असं समजणाऱ्यांनो
उफाळणारा सागर स्वतःचे डोळे झाकून
        कधी शांत होत नाही...
आता फक्त तयारी ठेवा की,
        आपण कोणत्याही क्षणी
खवळलेल्या सागराशी झुंज देणार आहोत
        हिम्मत असेल तर
डोळे उघडून हा वादळी समुद्र पाहा
        नाहीतर असंच डोळे झाकून
सागराच्या तळाशी जा.

## ३८

हे क्रेमलिन – लाल चौकातील भूमी
        मला एक विशाल सामर्थ्य दे
माझ्या देशातील स्पृश्य–अस्पृश्यता
        जाती–पाती–धर्मांधता
ह्यांना हिंदी महासागरात बुडवू दे
        आणि त्या महासागरातून
मस्कवॉ–व्होल्गांनी संपन्न केलेली
        एक नवी व्यवस्था
मला धारण करू दे
        उरल, कॉकेशियस, हिमालय, सह्याद्री
पर्वतांची विशाल रथांची चाकं
        मॉस्को दिल्लीच्या गतिमान सुवर्णरथाला जोडून
साऱ्या विश्वावर शांतीसाम्राज्य स्थापण्यासाठी
        हे क्रेमलिन ! एकविसाव्या शतकाचा सूर्य
माझा सारथी म्हणून दे
        मला हे एकच महान् सामर्थ्य दे.

## ३९

हे मॉस्को ! कला आणि क्रांतीच्या नगरी
तुझ्या सुंदर हृदयसरोवरातील
माणसांची गुलाबी डवरलेली कमळं
घेऊन, मला माझ्या नेत्रांत
बागा फुलवू दे
हे जगातील सुंदर मानस सरोवर
राजहंस- राजहंसींनी व्यापून गेलंय

हे मॉस्को ! माझी जीवननौका
ह्या कमळांच्या भोवती विहरत राहू दे
आणि मला एक विशाल कालवा
मॉस्कोहून दिल्लीपर्यंत खणून दे
ही सारी कमळं वाहात
माझ्या होडीमागून येऊ देत
त्यानं जगाला सुखसमृद्धी मिळेल
माझ्या भारतातही अशीच परंपरागत समजूत आहे

हे मॉस्कोच्या कमळसरोवरा
तुझी भूमीगत गुपीतांची दारं
मला जगासाठी उघडी करू दे.

## ४०

आज हवा बंद का ?
आज श्वास मंद का ?
निळ्या आभाळाखाली
काळे ढग कुठून आले ?
रोजचे सोनेरी रंग
आज कुठे उडून गेले ?
किती वर्षांनी आज
डोळा भरून संध्याकाळ पाहिली
मनात उगीच भयाण रात्रीची
सावली उभी राहिली
... पण क्षितिजापलिकडून
मंजूळ आवाज कोणाचा येतोय ?
आकाशातील रुपेरी दिव्यांचा प्रकाश
मनात कोण ओततोय ?
आत कोणते अनामिक घोष घुमताहेत
वाटतंय... आणखी श्वास मंद व्हावेत
म्हणजे उमलणाऱ्या फुलांचे साद ऐकायला येतील
आणि शांत हवेतील वादळंही जन्माला घालता येतील.

## ४१

मॉस्कोत निरोपाची संध्याकाळ
मी निर्धारपूर्वक स्वीकारली
हे माझ्या काळजाच्या मायभूमी !
जन्म न घेताही तूच माझी जन्मभूमी
ताश्कंद-समरकंद-युक्रेन-जॉर्जिया
माझ्या आतील महान् शांतीयुद्धाच्या
' अजिंक्य ' रेजिमेंटच्या फौजा
आज कुठं कूच करीत निघाल्यात ...
हे रात्रीचं निळसर धुकं
त्या नृत्याच्या धुंद रात्री
इझमॉयलोस्की पार्कमधला धुवाँधार पाऊस
संगीताच्या तालावर कोसळणारा ...
हे प्रिय सायंकाळच्या सुंदर स्वरांनो
आज ही हवा मला कुठं घेऊन निघालीय ?
खरं तर एकही रात्र
मी इथं झोपलो नाही
जागृतीच्या महान् आकाशाकडे पाहाताना
वाटतंय उज्ज्वल आणि तेजस्वी भविष्यासाठी
अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी-सुखासाठी
ही संध्याकाळच आता पहाट झालीय
पूर्व-पश्चिमेची ...

## ४२

पुढं कोण काय होईल कुणी सांगावं ?
म्हणून हे माझ्या प्रिय मॉस्को
आज तुझे आवाज माझ्याभोवती
दुमदुमत राहिले पाहिजेत
उद्या कदाचित् हे आवाज बदलले
तर मलाही ते ऐकू आले पाहिजेत
त्यासाठी बदलायची शक्ती आजपासूनच हवी
शेवटी आयुष्य म्हणजे आपलेच बुलंद आवाज
आतले बाहेरचे रस्त्यावरचे ...

REFBK-0025568
REFBK-0025568